प्रेसनोट दि.१४/०३/२०१९

**दत्तवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर**

**तडीपार बुक्का गावडेला अटक**

दत्तवाडी पोलीस स्टेशन हद्दीत राहणारा दीपक उर्फ बुक्का मोहन गावडे याला दिनांक १३ मार्च २०१९ रोजी शिवाजीनगर कोर्ट गेट नंबर ४शिवाजीनगर पुणे च्या बाहेर पकडण्यात आले. दत्तवाडी पोलीस स्टेशन च्या रेकॉर्ड वरील आरोपी दीपक उर्फ बुक्का मोहन गावडे वय २८ वर्ष राहणार सर्वे नंबर ९२ शाहू वसाहत,लक्ष्मी नगर,पर्वती पुणे याला मंगेश शिंदे पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ पुणे शहर यांनी १ वर्षासाठी पुणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून तडीपार केलेला असतांना व तडीपार मुदतीत पुणे शहरात येण्या साठी त्याने अधिकृत परवानगी घेणे आवश्यक असताना ती परवानगी न घेता तो येणार असल्याची गुप्त बातमी दत्तवाडी पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस कॉन्स्टेबल सागर लाला सुतार यांना मिळाली असल्याने त्यांनी त्याच्यावर पाळत ठेवून शिवाजीनगर कोर्टाच्या बाहेर त्याने तडीपार आदेशाचा भंग केला म्हणून त्याला सार्वजनिक रस्त्यावर ताब्यात घेतले आहे.त्याच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे कारवाई करूनगुन्हा नोंद करण्यात आला आहे ,वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारेयांच्या मार्गदर्शना खाली पोलीस नाईक सुधीर घोटकुले हे गुन्ह्याचा तपास करत आहेत.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन,पुणे